E-३०८४१८२

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३४२०

क्र.अकंपा-१२१८/प्र.क्र.१३६/का.आठ,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- १० मे, २०१८.

784
टपालात सेवा-८

८९८/सेवा-८
९/५/२०१८

प्रति,

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) सह सचिव, का.१४-अ, सा.प्र.वि. (बृहन्मुंबईमधील गट 'क' संदर्भात),

**विषय :- गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदासाठी तसेच गट-ड मधील पदासाठी सुधारित शैक्षणिक अर्हता विहीत केलयामुळे अनुकंपाधारकांची नावे प्रतीक्षासूचीवर घेताना अवलंबवयाच्या कार्यापध्दतीबाबत.**

**संदर्भ :** (१) शासन अधिसूचना,सा.प्र.वि., क्र. आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दि. ०६.०६.२०१७
(२) शासन अधिसूचना क्र. आटीआर १०१३/प्र.क्र.५०/१३/१४-अ, दि. २१.०२.२०१८
(३) शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही २०१४/प्र.क्र.३२२/का.१२, दि. ०६.०६.२०१८
(४) शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही २०१४/प्र.क्र.३२२/का.१२, दि. ०६.०१.२०१८

महोदय,

संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन अधिसूचना अन्वये बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "लिपीक-टंकलेखक", गट-क (सेवाप्रवेश) नियम,२०१७ विहीत केले असून लिपीक-टंकलेखक पदासाठी "पदवी" ही शैक्षणिक् अर्हता विहीत करण्यात आली. संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन अधिसूचना अन्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपीक-टंकलेखक गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ विहीत केले असून लिपीक-टंकलेखक पदासाठी "पदवी" ही शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आली. तसेच संदर्भाधीन क्र. (३) येथील शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-ड पदाचे सेवाप्रवेश नियम, २०१७ विहीत करण्यात आले असून गट-ड मधील पदासाठी माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २६.१०.१९९४ नुसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन सळसेवेने भरल्या जाणा-या राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट-क व गट-ड मधील पदावर देण्यात येते. शासन परिपत्रक, दि. ०५.०२.२०१० नुसार दिवंगत शासकीय कर्मचा-याच्या पात्र वारसदाराने ज्या दिनांकाला संपूर्ण कागदपत्रांसहीत परिपूर्ण अर्ज सादर केला

आहे, त्या दिनांकाला त्याचे नाव अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवर घेतले जाते. शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २२.०८.२००५ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी दुहेरी प्रतीक्षासूची ठेवण्यात येते. नियुक्ती प्राधिकारी यांनी अर्जदाराने परिपूर्ण अर्ज सादर केल्याच्या दिनांकाला प्रतीक्षासूचीत नाव समाविष्ट केल्यानंतर त्याच दिनांकाला अर्जदाराचे नाव संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवणे आवश्यक आहे.

५. अनुकंपा धोरणातील उपरोक्त नमूद तरतुदी विचारात घेता दिवंगत कर्मचा-याच्या पात्र वारसदाराने विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज लिपीक-टंकलेखक व गट-ड मधील पदाचे सुधारित सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वी सादर केला असेल परंतु प्रशासकीय विलंबामुळे त्या उमेदवारांचे नाव अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट केले गेले नसेल अशा वेळी सदर उमेदवारांचे नाव हे त्यांनी परिपूर्ण अर्ज सादर केलेल्या दिनांकालाच घेणे आवश्यक आहे. त्यांचा प्रतीक्षासूचीमधील अर्जाचा दिनांक हा सुधारित सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वीचा असणार आहे. त्यामुळे त्यांना सुधारित लिपीक-टंकलेखक पदाच्या सेवाप्रवेश नियम व गट-ड मधील पदाच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेची अट लागू राहणार नाही. तथापि ज्या उमेदवारांनी सुधारित सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वी अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज सादर केला आहे परंतु सदर अर्ज हा परिपूर्ण नसल्याने, अशा उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता सुधारित सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकानंतर केली असल्यास त्यांनी ज्या दिनांकाला कागदपत्रांची पूर्तता केली आहे त्या दिनांकाला त्यांचे नाव अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवर घेणे आवश्यक असल्याने अशा उमेदवारांचे नाव सुधारित सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकानंतर त्यांनी परिपूर्ण अर्ज केलेल्या दिनांकाला घ्यावे लागेल त्यामुळे त्यांना सुधारित लिपीक-टंकलेखक व गट-ड मधील पदाच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेची अट लागू राहील. सदर सुधारित शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांचे नाव अनुकंपा नियुक्तीच्या गट-क किंवा गट-ड मधील पदाच्या प्रतीक्षासूचीवर घेण्यात यावे.

**आपला,**

१०/५/१८

**(राजेंद्र वाघ)**

**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

महाराष्ट्र शासन

ई-मेल तात्काळ

email-id-doser४.pwd@mahapwd.com
website-www.mahapwd.com
दूरध्वनी : ०२२ २२०४०९८९

क्र. अकंपा-२०१८/प्र.क्र. १५२ /सेवा-४
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
दिनांक :- १० ऑगस्ट, २०१८.

प्रति,

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.
२) मुख्य अभियंता (विद्युत) सा.बां. विभाग मुंबई.
३) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
४) मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, नवी मुंबई.
५) अधीक्षक अभियंता (यांत्रिकी),नवी मुंबई.
६) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम परिमंडळे, मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.
७) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
८) संचालक, उपवने व उद्याने, मुंबई.

**विषय -: अनुकंपाधारकांची नावे प्रतीक्षासूचीवर घेताना अवलंबवयाची कार्यपध्दतीबाबत.**

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्र. अकंपा १२१८/प्र.क्र. १३६/कार्या. ८ दि. १० मे, २०१८.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राची पत्र सोबत जोडण्यात आली आहे. सदर पत्रान्वये गट-क मधील लिपिक -टंकलेखक पदासाठी तसेच गट-ड मधील पदासाठी सुधारित शैक्षणिक अर्हता विहित केल्यामुळे अनुकंपाधारकांची नावे प्रतीक्षासूचीवर घेताना अवलंबवयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

२. गट-क मधील लिपिक -टंकलेखक पदासाठी तसेच गट-ड मधील पदासाठी अनुकंपाधारकांची नावे प्रतीक्षासूचीवर घेताना सदर पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत : वरिलप्रमाणे

(ज. श. सागडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

कार्यासन (सेवा-४) सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती).